॥श्रीः॥

# बलं हि अलं निग्रहाय दोषाणाम् ॥

अथ एतद् लेखस्य आरम्भे देवीं सरस्वतीं - ज्ञानदेवतां तथा च भगवान धन्वंतरी चिकित्साविज्ञानस्य गुरु परम्परां प्रार्थनां करोमि |

तेजोऽसि तेजो मयि धेहि
वीर्यमसि वीर्यं मयि धेहि
बलमसि बलं मयि धेह्योजोऽस्योजो मयि धेहि ॥
यजुर्वेद १९.९

तू तेज स्वरूप आहेस , मला तेज प्रदान कर . तू वीर्यस्वरूप आहेस , मला वीर्य प्रदान कर . तू बल स्वरूप आहेस , मला बल प्रदान कर . तू ओज स्वरूप आहेस , माझ्यामध्ये ओज प्रस्थापित कर .
हरि ॐ॥

“शास्त्रं गुरुमुखोद्गीर्णम्” याचा अर्थ असा की, शिष्याने गुरूंच्या मुखातून प्रकट झालेली शास्त्रसूत्रे श्रद्धेने ग्रहण करावीत आणि त्यावर चिंतन व मनन करावे. शास्त्रांच्या अध्ययनाची ही परंपरा अनादी काळापासून चालत आलेली आहे. त्याचप्रमाणे, ज्ञान संपादन करण्यासाठी एक विद्यार्थी एखाद्या अत्यंत अनुभवी वैद्यांकडे जात असे. गुरूंच्या सानिध्यात राहून, आयुर्वेदाची तत्त्वे जाणून घेण्याविषयी त्याला उत्कट जिज्ञासा असे. एकदा प्रश्न केला,”बलं हि अलं निग्रहाय दोषाणाम्| *( च.चि.३/१६७)* या सूत्राबद्दल मला जाणून घ्यायचे आहे .” वैद्य मंद स्मित करत म्हणाले,” हे केवळ सूत्र नसून एक अर्थपूर्ण असा सिद्धांत आहे.आपण अतिदेशाने या संक्षिप्त सूत्रामागील अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करुयात.”
दक्ष यज्ञाच्या वेळी रुद्र प्रकोपातून ज्वराची उत्पत्ती झाली. देहपातळीवर कोष्ठस्थित अग्नि पक्तिस्थानातून बाहेर पडून सार्वदेहिक संताप उत्पन्न करून ज्वरनिर्मिती होते. ते स्थानच्युत तेज दीर्घकाळ शरीरधातूंच्या संपर्कात आल्याने धानुदौर्बल्य निर्माण होऊन पुढे जीर्णज्वराची संप्राप्ती घडून येते. अनेकदा रुग्ण प्रमादाने ज्वरमोक्ष झालेला नसतानाही औषधे घेत नाहीत व तो ज्वर कित्येक दिवस शरीरात मुरत पडतो . व्यवहारात असे रुग्ण पाहण्यात आले असतील.

दौर्बल्याद्देहधातूनां ज्वरो जीर्णोऽनुवर्तते||
बल्यैः सम्बृंहणैस्तस्मादाहारैस्तमुपाचरेत्|
च.चि.३/२९१

ज्वर नामक व्याधी दीर्घकाल शरीरात असणे (व्याधिक्षपण) व त्यामुळे देहधातूंना प्राप्त झालेले दौर्बल्य, स्रोतसांना आलेले रूक्षत्व तज्जनित वातप्रकोप अशा अवस्थेत बल्य चिकित्सा करावी. बृंहण करणारा मांसाहार व बलवर्धक आहार द्यावा.(अ.सं.चि.२/११| च.चि.३/१६७) ज्यायोगे शरीराला बल प्राप्त होईल व दोषहरणार्थ हेच बल श्रेष्ठ औषध होय. ‘दोष निग्रहण’ ही एक विशिष्ट संकल्पना या सूत्रात मांडली आहे.नि+ग्रहण ; नियमेन ग्रहणमिती {कल्पद्रुम} निग्रह अर्थात बंधनात ठेवणे [Restraining,Confinement, Boundary; Monier - Williams] संहितांमध्ये दोष निग्रहणाचा फार ठराविक वेळा उल्लेख केला आहे; त्यापैकी ही एक अवस्था!
दोष क्षीण झालेले असताना ते उपद्रवकारक ठरु नयेत यासाठी त्यांवर नियंत्रण ठेवणे. याचा एक मार्ग म्हणजे धातूबल वाढवणे.
आयुर्वेदानुसार बल ही अनेकांगी संकल्पना आहे जी आपण विस्तारपूर्वक पाहूया...

❖ <u>आयुर्वेदोक्त बल संकल्पना</u> :

व्युत्पत्ती - बल (नपुं)
शब्दकोशातील अर्थ - सामर्थ्यन् (अमरकोश)
देहजे सामर्थ्ये (वाचस्पत्यम्)

आर्ष ग्रंथांमध्ये बल हा शब्द वारंवार दिसतो. व्यायामशक्तीनुसार आपण बलपरिक्षा करू शकतो.
बलं व्यायामशक्त्या परिक्षेत् ॥ च.वि.४/८
मात्र व्यपदेशस्तू भूयसा न्यायाने प्रसंगानुरूप याचा रुग्णबल, व्याधीबल,अग्निबल,दोषबल,धातुबल असे अर्थ घ्यावे लागतात. कारण 'हा सूर्य नि हा जयद्रथ' हे एकेरी समीकरण बलाच्या बाबतीत लागू होत नाही. त्यामुळे <u>अंधगजन्यायानुसार</u> अनेक अंगांनी बल संकल्पना समजून घ्यावी लागते.

➢ ग्रंथोक्त परिभाषा :

• बलं शरीरोपचयः । डल्हण सु.सू. १/२८
• उत्साह । डल्हण सु. ३/४१,९२
• बलं- प्राणः । अरूणदत्त. अ.हृ. सू २/१६
•बलं उत्साहोपचयलक्षण । डल्हण सु.सु. ६/१५
•बलं क्रियानिर्वर्तनक्षमता । डल्हण सु.सू. ५/६
•पौरुषं शारीरं बलं, पराक्रमस्तु शौर्याख्यं मानसं बलम्| चक्र.च.सू.११/३
•देहस्य बलं देहबलम्| चक्र.च.सू.६/५

मूळ ग्रंथात बलाची व्याख्या नसली तरी टीकाकार मोजक्या शब्दात नेटका अर्थ सांगतात. प्रत्येक परिभाषा आपल्याला नवा आयाम दर्शवते. बल म्हणजे शरीराचा उपचय तसेच उत्साहाला देखील बल म्हटले आहे. एखादि क्रिया करण्याची क्षमता म्हणजे बल! प्राणाला देखील बल संज्ञा दिली आहे. थोडक्यात धातुबल, ओज, उदान वायु, मांस-मज्जा-शुक्र धातू, प्राकृत कफ,व्याधीक्षमत्व, सत्त्व,सार, संहनन,इ. तसेच इतरही काही भावांना स्पर्श करत बल समजून घेता येते.

“अच्छा!पण गुरुजी बल नेमके येते कुठून?” “सांगतो -

● बलाची उत्पत्ती कशी होते**?**

शुक्रशोणित संयोगाने गर्भाची निर्मिती झाल्यावर उपस्थित गर्भवृद्धिकर भावांपैकी 'बल' हा <u>सात्म्यज भाव</u> होय. तसेच सुश्रुतांनी याबरोबरच बल व शरीर उपचय हे <u>रसज भाव</u> असल्याचे सांगितले आहे. (च.शा.३/३३) अर्थात बल हा गर्भोत्पत्ती समयी उपस्थित असणारा भाव आहे.
ततः *(गर्भः)* प्राप्तकालः सर्वेन्द्रियोपपन्नः परिपूर्णशरीरो बलवर्णसत्त्वसंहननसम्पदुपेतः सुखेन जायते। *(च.शा.३/३)*
प्रसवकाळी हा गर्भ बल-वर्ण-सत्त्व-संहनन यांनी परिपूर्ण असा सुखपूर्वक जगात येतो हेच सहजबल होय.

- बलप्रमाणविशेषज्ञानार्थ **-** सारपरीक्षा॥

एखादया व्यक्तीची केवळ अंगकाठी पाहून आपण बलाचे अनुमान लावू शकत नाही. अन्यया 'पिपीलिकाभारहरणवत्।' स्थिती होते ; असे सांगताना चरक संहननावरून बलाचे अनुमान सांगतात -
तत्र सुसंहतशरीराः पुरुषा बलवन्तः, विपर्ययेणाल्पबलाः, मध्यत्वात् संहननस्य मध्यबला भवन्ति||च.वि ८/११६
सुसंघटित शरीर असणारे बलवान असतात. मात्र केवळ संहननाने धातूंचे बल लक्षात येत नाही; त्यासाठी सार परिक्षणच हवे. धातू साक्षात शरीर धारण करत असल्याने त्यांचे बलवान असणे एकूणच बलासाठी गरजेचे आहे. वै.वेणीमाधवशास्त्री जोशींच्या मते शरीरावर निसर्गाचे सतत परिणाम होत असतात. निसर्ग व शरीर यांच्या झगड्यात शरीरधातू बलवान व पुष्ट असणे आवश्यक आहे.
[धातूसारासारत्व- वै.वेणीमाधवशास्त्री जोशी] ते रोग होऊ देत नाहीत व रोग झाल्यानंतरही सारखा प्रतीकार करत राहतात. यासाठी सारपरीक्षण आवश्यक आहे. व असार धातूंना सारवान करणारी चिकित्सा आवश्यक आहे.
○ मांससारता - बलवन्त
○ मज्जासारता-बलवन्त
○ शुक्रसारता-बलवन्त
या धातूंच्या सारतेमध्ये बलाचा स्पष्ट उल्लेखावरून त्या धातूसारतेवर देहबल विशेष अवलंबून असते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.वयानुसार या बलात बदलही होतात. युवावस्थेत सर्वधात्विन्द्रियबलवीर्य संपूर्णता असते तर वृद्धावस्थेत हेच क्षीयमाणधात्विन्द्रियबल होते. (सु. सू.३५/२९) सारवान धातूंनी युक्त शरीरात दोषदुष्टी कमी संभवते व थोडीफार असल्यास धातुघटक त्यांना सामावून घेतात. जसे बलवान शरीराला विरुध्दाशन दोषही विकृत करू शकत नाहीत -
"व्यायामम‍िग्यदीप्तग्निदयस्य बलशालिनाम् ।विरोध्यमि न पीडाये..||"

- प्राकृतस्तु बलं श्लेष्मा ॥

प्राकृतस्तु बलं श्लेष्मा विकृतो मल उच्यते|
स चैवौजः स्मृतः काये स च पाप्मोपदिश्यते||च.सू.१७/११७
त्रिदोषांपैकी कफदोष पृथ्वि व आप महाभूतप्रधान असल्याने प्राकृत अवस्थेत बल प्रदान करण्याचे काम करतो. (सु.सू. १८४/१७)
स्नेहो बन्धः स्थिरत्वं च गौरवं वृषता बलम्|क्षमा धृतिरलोभश्च कफकर्माविकारजम्||च.सू.१८/५१
प्राकृत अवस्थेत कफाला बल म्हटले जाते. तसेच ओजही म्हटले जाते. हेच कफरुपी ओज अर्धांजली मात्रेत सर्व देहात स्थित असते.

- उदानस्य कर्म बल ॥

तंत्रयंत्रधरस्वरूप असलेला वायू शरीरातील अनेक क्रियांना नियंत्रित करणारा आहे. गर्भाकृती निर्मितीपासून ते शेवटच्या उच्छ्वासापर्यंत धातूंची समगती राखण्याचे कार्य करतो (च.सू१८/४९) व्यवहार सौकर्यासाठी केलेल्या वायूच्या पाच विभागांपैकी उदानवायू बल प्रदान करण्याचे काम करतो (बलवर्णादि कर्म च ॥ च.चि.२८ ७) (अ.ह सू.१२/६)

- समधातु शरीर - सततमनुपालयितव्य ॥

"समदोष: समाग्निश्च समधातुमलक्रियाः" असे त्रिदोष साम्यावस्थेत असलेले समधातू शरीर सर्वक्रिया करण्यास समर्थ असते. अशा शरीरात सहसा रोग उत्पन्न होत नाहीत. ते सम दोष पुरुषाला बलवान करतात. (च. सू. १२/१३) सुश्रुतांनुसार असे शरीर क्षुत्पिपासा, शीतोष्णवर्षाआतप सहन करण्यास सक्षम व बलवान असते व अशा शरीराचे अनुपालन करावे. चरकांनी देखील व्याधी अक्षम शरीराचे वर्णन करताना 'दुर्बल'शरीर असणे हे एक कारण सांगितले आहे (च.सू. २८/७)

- ओजः बलम् इति उच्यते ॥

तत्र रसादीनां शुक्रान्तानां धातूनां यत् परं तेजस्तत् खल्वोजस्तदेव बलमित्युच्यते, <u>स्वशास्त्रसिद्धान्तात्</u> ||
सु. सू. १५/१९
सुश्रुतांनी ओजालाच बल ही संज्ञा दिली आहे.  रसादि धातूंचे से परमतेज ते ओज शरीरातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.
यन्नाशे नियतंनाशो । *(अ. ह.सू. ११ /३८ )* ज्याचा नाश झाल्यास निश्चितपणे जीवनाचा नाश होतो असे ओज पर- अपर या स्वरुपांत शरीराला चेतना-उर्जा-उत्साह प्रदान करून टिकवण्याचे कार्य करते .ओजाच्या स्थितीवर व्याधिक्षमत्व अवलंबून असते.


➢ <u>व्याधिक्षमत्व</u>


<u>“व्याधिक्षमत्वं व्याधिबलविरोधित्वं व्याध्युत्पादप्रतिबन्धकत्वमिति यावत् ॥”</u>
<u>चक्रपाणी च. सू. २८ /७</u>

शरीरातील व्याधीच्या विरोधी कार्यकारी तत्त्व म्हणजे व्याधिक्षमत्व!हे तत्त्व दोन प्रकारे कार्य करते :
१) <u>व्याधिबलविरोधित्व</u> -
उत्पन्न झालेल्या व्याधीच्या बलाचा विरोध करणे. ज्याच्यायोगे व्याधी गंभीर अवस्थेकडे जाण्याला विरोध केला जातो. फार उपद्रव न करता व्याधीमोक्ष होतो .शरीर व्याधित अवस्थेकडून प्राकृत अवस्थेकडे आणण्याचा प्रयत्न केला जातो. याला स्वभावोपरमवादाच्या दृष्टीने पाहिल्यास एकीकडे धातूवैषम्य स्वत: नष्ट होत असते - प्रवृत्तिहेतुर्भावानां न निरोधेऽस्ति कारणम् । *(च.सू.१६/२८)* दुसरीकडे व्याधिबलविरोधित्वामुळे धातुसाम्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असतो. आणि धातुवैषम्य नाहीसे करून विषमधातुपरंपरा नष्ट करण्यासाठी - भेषजरूपी चिकित्सा सहाय्यभूत ठरते.

२) <u>व्याधिउत्पादप्रतिबंधकत्व</u> -
व्याधी उत्पन्नच होऊ नये याची काळजी घेणे.
शरीराचा कल हा समत्वाकडे असतो. दोष-धातू-मल सम रहावेत यादृष्टीनेच देहव्यापार सुरु असतो. प्रज्ञापराधाने हेतूसेवन करून मनुष्य त्यात बाधा आणतो. कारण - न सद्यो दोषवान् भवत्यपचारः ।(च.सू.२८/७)
शरीरात जे वैषम्य निर्माण होते ते साम्यावस्थेत आणण्यासाठी शरीर २ मार्गांनी प्रयत्न करते-
क्षीण घटकांची वृद्धि व वृद्ध घटकांचा क्षय !
“निमित्ततस्तु क्षीणवृद्धानां प्रसादाख्यानां धातूनां वृद्धिक्षयाभ्यामाहारमूलाभ्यां रसः साम्यमुत्पादयत्यारोग्याय, किट्टं च मलानामेवमेव|” च.सू. २८|४
याचे स्पष्टीकरण योगिंद्रनाथ सेन उत्तम प्रकारे करतात :- शरीरात दोन प्रकारे वैषम्य निर्माण होते - निमित्ततः आणि प्राकृततः


प्राकृततः दोष स्वमानापेक्षा अधिक वाढल्यास त्यांना उत्सर्जित केले जाते अथवा विपरीत गुणेच्छेद्वारे शमन केले जाते .
निमित्ततः दोष क्षीण झाल्यावर वृद्धि तर वृद्ध झाल्यावर क्षय केला जातो. मलांच्या बाबतीतही हेच ग्राह्य धरावे.




- अग्निबल

युक्तेऽन्नकाले क्षुत्क्षामं लघून्यन्नानि भोजयेत्|तथा स शीघ्रमाप्नोति रुचिमग्निबलं बलम्||च.चि.१९/२३
अतिसार चिकित्सेतील हे सूत्र अग्निबल हेच बल असल्याचे सांगते. अशाच आशयाचे आणखी एक सूत्र अर्शचिकित्सेत-
एषामग्निबले हीने वृद्धिर्वृद्धे परिक्षयः|
तस्मादग्निबलं रक्ष्यमेषु त्रिषु विशेषतः||च.चि.१४/२४५
अग्निबल क्षीण झाल्यावर रोगवृद्धि होते याकारणास्तव अग्निचे रक्षण करावे . अग्निचे महात्म्य सांगण्यासाठी ही सूत्रे पुरेशी आहेत.




- सत्वबल

सत्व देखील त्रिविध प्रकारचे असते . त्यानुसारच रोगाचे साध्यासाध्यत्व ठरते .
म्हटलेच आहे - विषादो रोगवर्धनानाम्॥ त्यामुळे सत्त्व बलावरही बल टिकून असते.

- ➢ त्रिविध बल

त्रिविधं बलमिति- सहजं, कालजं, युक्तिकृतं च|
सहजं यच्छरीरसत्वयोः प्राकृतं, कालकृतमृतुविभागजं वयःकृतं च, युक्तिकृतं पुनस्तद्यदाहारचेष्टायोगजम्||३६
च.सू. ११ |३६

<u>१) सहज बाल -</u>

सहजं यच्छारीरसत्वयोः प्राकृतं ।

जे शरीर व मनाचे प्राकृत बल ते सहज बल बल होय. <u>प्राकृतमिति जन्मादिप्रवृत्त</u>, अर्थात जन्माच्या पूर्वीपासून जे धातू उपस्थित असतात त्यांचे बल अर्थात सारता जे आपण पूर्वी पाहिले. <u>सत्त्वं मनः, मन सो बलं वा यत् उत्साह उच्यते । यद्विर्यमुच्यते इति पाठभेद ।</u> सत्त्व - आत्मा -शरीर हे त्रिदंडाप्रमाणे आहेत. त्यापैकी सत्त्व म्हणजे मनाचे बल देखील सहजबल होय. यालाच उत्साह वा वीर्य असे म्हणतात. म्हणून अल्पसत्त्व व्यक्तींना झालेले व्याधी कष्टसाध्य सांगितले आहेत. कारण शरीराच्या बलातकेच मनाचे बल ही महत्त्वाचे आहे.

२) <u>कालज बल</u>

काळाच्या अपेक्षेने जे बल ते कालकृत बल. काल दोन प्रकारचा- ऋतूविभाग व वयोभेदाने

• आदानं च तदादत्ते नृणां प्रतिदिन बलम् ॥ अ.हृ.सू २|२
•वर्षादयो विसर्गश्च यद्बल विसृजत्ययम् । अ.हृ.सू २|५
•आदावन्ते च दौर्बल्यं विसर्गादानयोर्नृणाम्| मध्ये मध्यबलं, त्वन्ते श्रेष्ठमग्रे च निर्दिशेत्||॥ च.सू.६/८

साधारणत: आदानकाळ हा शिशिरादि ऋतूंमध्ये येतो व बनवान सूर्य मनुष्याचे बळ उत्तरोत्तर कमी करत जातो. वर्षादि ऋतूंच्या विसर्गकाळात चंद्रबल वृद्धिगत असल्याने मनुष्याचे बल उत्तरोत्तर वाढत जाते. हा कालस्वभाव होय. त्यामुळे

○ हेमंत ऋतू, शिशिर ऋतू - उत्तम बल
○ शरद ऋतू, वसंत ऋतू - मध्यम बल
○ वर्षा ऋतू, ग्रीष्म ऋतू - हीन बल

वयोभेदाने बाल, युवा व वृद्धावस्थेत अनुक्रमे अल्प/वर्धमान बल - परिपूर्ण बल - क्षीयमाण बल असते हे आपण पूर्वीच पाहिले .

३) <u>युक्तिकृत बल</u>

युक्तिः आहारचेष्टयोः सम्यक् शरीरेण योजना । चक्र

आहार, चेष्टा इ. चा सम्यक योग करून क्षीण झालेले बल पुन्हा प्राप्त करणे म्हणजे युक्तिकृत बल !सहज व कालज बल ही पूर्णत: वैद्याच्या हातात नसलेली गोष्ट आहे. मात्र युक्तिकृत बल हे वैद्याच्या विशेष कामाचे ! युक्ति वापरून हे बल वाढविता येते. (चिकित्सोपयोगी बल)
<u>आहारस्य मांससर्पिरादेः, चेष्टाया उचितविश्रामव्यायामादेर्योग आहारचेष्टायोगः; अन्ये तु योगशब्देन रसायनप्रयोगं ग्राहयन्ति | चक्र</u>

• बलवर्धक आहार- क्षीर, मांस, सर्पि, नवनीत, मधुर रसात्मक आहार , सर्वरसाभ्यास (अग्र्य)
• बलवर्धक विहार- अर्धशक्ती व्यायाम
• अन्य - रसायन प्रयोग ( शोधन व रसायन फलश्रृती)

"गुरुजी आता माझ्या लक्षात आले बल ही अतिशय व्यापक संकल्पना आहे . मात्र हे झाले स्वास्थ व्यक्तींमध्ये, व्याधीत अवस्थेत बलाचा कसा विचार करावा ?"

“ पहा व्याधीत अवस्थेत बलाचा विचार सर्वतोपरी महत्वाचा आहे . व्याधी परीक्षण करताना बलविचार महत्वपूर्ण ठरतो .
विकृतितश्चेति विकृतिरुच्यते विकारः|
तत्र विकारं हेतु-दोष-दूष्य-प्रकृति-देश-काल-बलविशेषैर्लिङ्गतश्च परीक्षेत, न ह्यन्तरेण हेत्वादीनां बलविशेषं व्याधिबलविशेषोपलब्धिः|
यस्य हि व्याधेर्दोष-दूष्य-प्रकृति-देश-काल-बलसाम्यं भवति, महच्च हेतुलिङ्गबलं, स व्याधिर्बलवान् भवति; तद्विपर्ययाच्चाल्पबलः; मध्यबलस्तु दोषदूष्यादीनामन्यतमसामान्याद्धेतुलिङ्गमध्यबलत्वाच्चोपलभ्यते||च.वि.८/१०१
व्याधी जाणून घेण्यासाठी हेतू,दोष,दूष्य,प्रकृति,देश,काल यांच्या बलाबलाचे ज्ञान आवश्यक ठरते.
याच बलावर चिकित्साक्रम तसेच औषधाची मात्रा ठरते.
मात्राया नास्त्यवस्थानं दोषमग्निं बलं वयः | व्याधिं द्रव्यं च कोष्ठं च वीक्ष्य मात्रां प्रयोजयेत् || कैयदेव निघण्टु, मिश्रकवर्ग
अरिष्ट लक्षणांतही क्षीणबलमांस असणे अरिष्ट सूचक असते. अशाप्रकारे बल संकल्पनेविषयी विस्ताराने जाणून घेतल्यावर या सिद्धांताची पुष्टी करणारी सूत्रसमिधा पाहू-

१) <u>रक्तपित्त चिकित्सा</u>

ऊर्ध्वगे शुद्धकोष्ठस्य तर्पणादिः क्रमो हितः|
अधोगते यवाग्वादिर्न चेत्स्यान्मारुतो बली ||च.चि.४/६१

रक्तपित्तात उभयमार्गाने शोधन केल्यावर कोष्ठशुद्धी झाल्यावर उर्ध्वग रक्तपित्तात तर्पणादि तर अधोग रक्तपित्तात यवागु आदिंचा वापर करावा, यामुळे वातदोष बलवान होत नाही. रक्तपित्तासारख्या आशुकारी व्याधीमध्ये दोष बलवान असताना प्रतिमार्ग हरणाने दोषनिर्हरण केले की वात प्रकोप होण्याची शक्यता असते. साक्षात रक्तधातू शरीराबाहेर जात असतो. अशावेळी आहाराने बल वर्धन करावे किंवा ज्वरोक्त विधीप्रमाणे मांसरस द्यावा ( चक्रपाणी )

२) <u>गुल्म चिकित्सा</u>

हृतदोषं परिम्लानं जाङ्गलैस्तर्पितं रसैः|
समाश्वस्तं सशेषार्तिं सर्पिरभ्यासयेत् पुनः||च.चि.५/३८

गुल्म व्याधीमध्ये रक्तधातूस विदग्धता प्राप्त होत असते व त्यामुळे शूल होत असतो. रक्तमोक्षणाने मूलछिन्न होते रुजा नाहीशा होतात. मात्र रक्तमोक्षण पश्चात रोगी म्लान होतो त्यावेळी त्यास आश्वासन देऊन जांगलमांसरसाने तर्पण करावे. तत्पश्चातही गुल्मजन्य रूजा शिल्लक राहिली असेल तर दोषशमनाकारिता घृतपान दयावे. अल्पदोषाचे शमनार्थ बृंहण चिकित्सा!

३) <u>प्रमेह चिकित्सा</u>

स्निग्धस्य योगा विविधाः प्रयोज्याः कल्पोपदिष्टा मलशोधनाय |
ऊर्ध्वं तथाऽधश्च मलेऽपनीते मेहेषु सन्तर्पणमेव कार्यम्||च.चि.६/१६

प्रमेह चिकित्सेतील हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण सूत्र ! मुळात स्थूल प्रमेही व कृश प्रमेही अशा भेदाने कृशाचे संबृहण व स्थूलाचे संशोधन अशी चिकित्सा सांगितली आहे.त्यानुसार कल्पस्थानोक्त विविध योगांद्वारे शोधन करावे. व उर्ध्वाधो

शोधन झाल्यावर देखील सर्व प्रकारच्या प्रमेहांमध्ये संतर्पण अवश्य केले पाहिजे. प्रमेहासारख्या बहुदोष प्रधान व्याधीत मुळात धातूंना शैथिल्य आलेले असते. जीर्ण अवस्थेत साक्षात ओज मूत्रावाटे शरीराबाहेर जात असते. यामुळे शोधन केले तरी वात प्रकोप होणारच आहे, अशा अवस्थेत अपतर्पण केले गेले तर उलटपक्षी गुल्मादी व्याधी होण्याचा धोका असतो. त्याऐवजी संबृहण करून शेष दोषांना जिंकावे.

४) <u>कुष्ठ चिकित्सा</u>

दोषे हृतेऽपनीते रक्ते बाह्यान्तरे कृते शमने ।
स्नेहे च कालयुक्ते न कुष्ठमनुवर्तते साध्यम् ||च.चि.७/१५१

कुष्ठ हा प्रमेहाप्रमाणेच बहुदोष बहुधातूगत व्याधी ! दोष शोधन,रक्तमोक्षण व बाह्य-आभ्यंतर विकारांचे शमन केल्यावर योग्य काळी स्नेहन - तैल वा घृताचा वापर करावा. यामुळे दीर्घकाळ व्याधीपीडित धातूंना बल मिळते व जे काही शेष दोष असतील ते शमन पावतात. अशाप्रकार चिकित्सा केल्याने साध्य कुष्ठाची पुनरावृत्ती होत नाही.

५) <u>राजयक्ष्मा चिकित्सा</u>

तस्मात् पुरीषं संरक्ष्यं विशेषाद्राजयक्ष्मिणः|
सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विड्बलम् ||च.चि.८/४२

राजयक्षम्याची अवस्था पूर्वोक्त अवस्थांपेक्षा भिन्न असून प्रसंगावशात त्याचे वर्णन करीत आहे. सर्व धातूंच्या अनुलोम वा प्रतिलोम क्षयातून यक्षम्याची उत्पत्ती होते. पर्यायाने सर्व धातूसार ओज अत्यल्प निर्माण होते ; त्यामुळे प्रसंगी पुरीषाचेही रक्षण करावे. कारण सर्वधातू क्षीण झालेले असल्याने त्या रोग्यामध्ये मलच त्याचे बल ठरतो. तात्पर्य व्याधितामध्ये बलरक्षणाचे महत्त्व सांगणारे हे अत्यंत महत्वाचे सूत्र ठरते.

६) <u>उदर चिकित्सा</u>

नरः संवत्सरेणैवं जयेत् प्राप्तं जलोदरम्|
प्रयोगाणां च सर्वेषामनु क्षीरं प्रयोजयेत्||
दोषानुबन्धरक्षार्थं बलस्थैर्यार्थमेव च|
प्रयोगापचिताङ्गानां हितं ह्युदरिणां पयः|
सर्वधातुक्षयार्तानां देवानाममृतं यथा||च.चि.१३/१९३-१९४

उदर हा असाच अजून एक गंभीर व्याधी .तीव्र स्रोतोरोधप्रधान अवस्था व त्रिदोषज संप्राप्ती. बहुदोष निर्हरणार्थ- नित्यमेव विरेचयेत् । त्यासह आवश्यक असल्यास शस्त्रकर्मही करावे. सर्वप्रकारच्या चिकित्सेनंतर क्षीर प्रयोग मात्र अवश्य करावा. रोग्याच्या दोषानुबंधानुसार त्याची रक्षा करण्यासाठी व बलाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी ही योजना! भेषजक्षपण व व्याधिक्षपण दोहोंमुळे धातूंचे बल कमी झालेले असताना इतरही सर्व चातूंच्या ठिकाणी क्षीणत्व आलेले असताना दुग्धपान हे अमृतासमान होय.

७) <u>अर्श चिकित्सा</u>

आभिः क्रियाभिरथवा शीताभिर्यस्य तिष्ठति न रक्तम्|
तं काले स्निग्धोष्णैर्मांसरसैस्तर्पयेन्मतिमान्||च.चि.१४/२२२

त्रिदोषप्रकोप होऊन गुदवलींचे विकाणी उत्पन्न होणारा अर्श हा व्याधी रुग्णाला अत्यंत पीडाकर ठरतो .त्याचे निवारणार्थ शस्त्रकर्म, दहन, क्षारकर्म अथवा अग्निकर्मासह विविध आभ्यंतर व स्थानिक प्रयोगांचा निर्देश आहे. विशेषतः रक्तार्शामध्ये स्तंभक व शीतोपचार करावे लागतात. या सर्व चिकित्सेनेही रक्तस्राव कमी झाला नाही तर पुन्हा अतिमात्रेत रक्तमोक्षण करणे शक्य नसते कारण व्यापदांचा धोका संभवतो. तस्मात् क्षीणधातुतर्पणार्थ बृंहण चिकित्सा द्यावी.( चक्र.) त्यासाठी स्निग्ध- उष्ण मांसरसाचा वापर करावा.

८) <u>ग्रहणी चिकित्सा</u>

दीर्घकालप्रसङ्गात्तु क्षामक्षीणकृशान्नरान्||
प्रसहानां रसैः साम्लैर्भोजयेत् पिशिताशिनाम्|
लघु, तीक्ष्णोष्णशोधित्वाद्दीपयन्त्याशु तेऽनलम्||
मांसोपचितमांसत्वात्तथाऽऽशुतरबृंहणाः|च.चि १५/२०९-२११

ग्रहणी हा व्याधी चिरकारी होऊन त्यायोगे मनुष्याचे शरीर क्षाम, क्षीण व कृश झाले असताना दीपन करण्याऐवजी अम्लयुक्त मांसरसाने रोग्याचे बृंहण करावे. मांसाशन करणाऱ्या प्राण्यांचे मांस लघु, रुक्ष, तीक्ष्ण व शोधन करणारे असल्याने रुग्णाचे बृंहण तर होतेच मात्र जाठराग्नि देखील प्रदीप्त होतो.

९) <u>छर्दि चिकित्सा</u>
वमिप्रसङ्गात् पवनोऽप्यवश्यं धातुक्षयाद्धृद्धिमुपैति तस्मात्|
चिरप्रवृत्तास्वनिलापहानि कार्याण्युपस्तम्भनबृंहणानि ॥ च.चि.२०/४६

छर्दिमध्ये साक्षात अबधातू शरीराबाहेर पडत असतो. त्यातही अनेक दिवस होणाऱ्या छर्दीमुळे धातूक्षीणता होऊन वातप्रकोप होत असतो. त्यामुळे छर्दिचे उपस्तंभन करावे व धातूंचे बृंहण करावे (चक्र) त्याकरिता सर्पिर्गुड ,क्षीरपाक ,अनेक वृष्ययोग, मांसरस यांचा वापर करावा. याने चिरकालीन छर्दि जिंकता येते.

"आता  तुझ्या लक्षात आले असेल की ज्वर चिकित्सेतील एक सूत्र मानून समान अवस्थांमधे चिकित्सासिद्धांत म्हणून वापरले आहे.
दैनंदिन व्यवहारात या सूत्राचा युक्तिपूर्वक वापर वैद्य करतात. चिकित्सेच्या अंती अपुनर्भवार्थ केली जाणारी रसायन चिकित्सादेखील याच सिद्धांतावर आधारित आहे. म्हणूनच वृद्ध वैद्य म्हणतात एकदा ज्वर कळाल्यावर सगळी चिकित्सा कळते .."

" होय, गुरुजी या मी या सूत्रारुपी सिद्धांतवर आणखी चिंतन मनन नक्कीच करुन व्यवहारात उपयोग करण्याचा प्रयत्न करेल ."

" उत्तम! उत्तम! यशस्वी भव !"

उपसंहार

बल हे ऊर्जास्वरूप शरीरात स्थित असते. शरीराचे तंत्र बिघडवणारी अनेक कारणे पदोपदी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. स्वस्थ असो वा रोगी हे बलच दोषांचे निग्रहण करते, बाह्य हेतूंचा प्रतिकार करते. हे बल सर्वांना प्राप्त व्हावे , त्याचे अधिष्ठान आरोग्य सर्वांना प्राप्त व्हावे. बलाचे प्रयत्नपूर्वक रक्षण करुयात!

बलं यत्नेन पालयन्|
बलाधिष्ठानमारोग्यम्
आरोग्यार्थः क्रियाक्रमः||
अ.हृ.१/२

इति न अलम् ॥